
उंदीर खाणारं मांजर




उंदीर खाणारं मांजर

मराठी : अश्विनी बर्वे





“त्या मांजराला नमस्ते म्हणा,
ज्यानं गरीब डिकला प्रसिद्धी मिळवून दिली.”






उंदीर खाणारं मांजर

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.इंग्लड मध्ये एक छोटा मुलगा राहत होता. त्याचे नाव डिक विटिंगटन होते. तो लहान असतांनाच त्याचे आईवडील वारले.तो काम करण्यासाठी खूप छोटा होता. तो खूप कष्टात आपले दिवस घालवत होता.गावातले लोक सुद्धा गरीब होते आणि ते त्याला खाण्यासाठी फक्त फक्त बटाट्याची सालं देवू शकत होते. डिक फाटके कपडे घालून इकडे तिकडे भीक मागत फिरत असे. एक दिवस एक घोडागाडीवाला लंडनला जात होता. “तू पण माझ्याबरोबर चल.गाडीवाला डिकला म्हणाला. अशाप्रकारे डिक लंडनला पोहचला.



डिकने लंडनच्या मोठ्या मोठ्या गोष्टी ऐकल्या होत्या. असे म्हणत की तिथे खूप श्रीमंत, राजवैभव असणारे लोक राहत होते. ते दिवसभर गाणे-बजावणे करत असत. आणि लंडनच्या सडकांवर सोन्याच्या विटा पसरलेल्या असत. “सोन्याच्या विटांची गोष्ट तर बिलकुल खोटी आहे,” डिक स्वतःशी म्हणाला.



जेव्हा डिक लंडनला पोहचला तेव्हा त्याला रस्त्यावर सोन्याच्या ऐवजी धूळ आणि घाण दिसून आली. लंडन एक अजब शहर होते. तिथे त्याचे कोणी मित्र नव्हते, की त्याला खायला अन्न नव्हते. त्याचा खिसा अगदी रिकामा होता. लवकरच डिकला वाटू लागले की, त्याने लंडनला येवून खूप मोठी चूक केली. जर आपण आपल्या गावात असतो तर शेकोटी जवळ बसून शेकत बसलो असतो. तो रस्त्यावर एका कोपऱ्यात बसून रडू लागा आणि तिथेच झोपून गेला.



एक भला माणूस तिथून जात होता, त्याने म्हटले, "बेटा, तू काही काम का करत नाही?"

"मी काम करायला तयार आहे," डिक म्हणाला, "पण मला काही काम मिळायला तर हवे?"

"चल तू माझ्या बरोबर चल," त्या भल्या माणसाने म्हटले. मग तो डिकला एका शेतावर घेवून गेला. तिथे डिकने खूप मेहनत केली आणि तो तिथेच राहिला. पीक निघाल्यावर डिकची तिथली नोकरी संपली.

आता डिक परत भटकू लागला.तो परत लंडनला आला. भुकेने व्याकूळ होवून तो बेशुद्ध पडला. मग तो एका श्रीमंत व्यापारी मिस्टर फित्जवारेनच्या घराच्या दरवाज्याच्या समोर पडला.



तेवढ्यात दरवाज्यात घरातली स्वयंपाकीण आली. तिने डिकला शिव्या दिल्या, ‘निघ इथून कामचोर! नाहीतर वरून मी खरकटे पाणी टाकेन.”

तेवढ्यात मिस्टर फित्जवारेन जेवण्यासाठी घरी आले.तेव्हा त्यांनी फाटके कपडे घातलेला, भुकेला मुलगा आपल्या दरवाज्यावर पाहिला. तेव्हा त्यांनी विचारले, “बेटा तुला काय त्रास आहे? तुझे वय तर काम करण्याचे आहे.”

“सर, मी गावचा गरीब मुलगा आहे,” डिक म्हणाला. “माझे आईवडील आता नाहीत आणि मला कोणी मित्रही नाहीत. मी कोणतेही काम करण्यास तयार आहे. पण मागच्या तीन दिवसांपासून मी काही खाल्लेले नाही.” डिक उठू लागला, पण अशक्तपणामुळे तो परत खाली पडला.



“या मुलाला घरात घेवून या,” मिस्टर फित्जवारेन यांनी आपल्या नोकरांना आज्ञा दिली. “त्याला काही खायला – प्यायला द्या. तो बरा झाल्यावर तो स्वयंपाकीण बाईंना साफसफाई करायला मदत करेन.”

कदाचित त्या घरात डिक चांगला राहिला असता. पण स्वयंपाकीण बाई त्याचा तिरस्कार करत होती.

“इकडे साफ कर, तिकडे साफ कर, कचरा कुंडी रिकामी कर, फरशी पूस ---! अगदी चकाचक कर!” मग स्वयंपाकीण बाईने त्याच्या डोक्यात झाडूच मारला.



स्वयंपाकीण बाई स्वयंपाक घरात सारखीच काही भाजत-तळत असायची. मग तिच्या हातात जे असेल त्याने ती डिकला मारायची. जेव्हा मिस्टर फित्जवारेनच्या मुलीने हे पाहिले तेव्हा ती तिला रागावली. “त्या मुलाबरोबर चांगली वाग, नाही तर दुसरीकडे निघून जा”

स्वयंपाकीण बाईच्या वाईट वागणुकीबरोबर चडिकला अजून एक त्रास होता. तो ज्या खोलीत झोपत असे ती धान्याची कोठी होती. त्यामुळे त्याच्या पलंगावर नेहमीच मोठ मोठे उंदीर फिरत असत. आणि त्याची झोप मोडत असत. तो रात्री क्षणभर सुद्धा झोपू शकत नसे.



एक दिवस बूट साफ करण्याचे एका माणसाने डिकला एक नाणं दिलं. दुसऱ्या दिवशी डिकने रस्त्यावर एक मुलगी बघितली. तिच्याजवळ मांजर होते. तो पळत तिच्याजवळ गेला. “या मांजराला तू कितीला विकशील?” त्याने विचारले.

“हे मांजर उंदीर पकडण्यात तरबेज आहे,” मुलगी म्हणाली. “हे मांजर खूप किंमतीला विकलं जाईल.”



“पण माझ्या खिशात फक्त एक नाणं आहे,” डिक म्हणाला, “आणि मला मांजराची खूप गरज आहे.” मग त्या मुलीने डिकला मांजर दिलं.

डिकने मांजराला कोठी घरात लपवून ठेवले. कारण जर स्वयंपाकीण बाईने तिला पाहिले असते तर, तिने मांजराला सुद्धा मारले असते. डिक आपल्या खाण्यातले काही अन्न मांजरासाठी राखून ठेवत असे. त्याच्या मांजराने – मिस. मनीने लवकरच सगळ्या उंदीरांना खाऊन टाकले. जे वाचले ते घाबरून आपल्या बिळात लपून बसले. आता डिकला रात्री चांगली झोप घेता येवू लागली.



लवकरच मिस्टर फित्ज़वारेन जहाजाने दूरच्या देशात जायला निघाले. त्यांनी आपल्या सर्व नोकरांना बोलावले आणि विचारले की, त्यांना विदेशात एखादी वस्तू विकण्याची इच्छा आहे का? सगळ्यांनी काही ना काही आणून दिले. फक्त डिकने काहीच दिले नाही. त्या बिचाऱ्या जवळ पैसेच नव्हते आणि विकण्यासाठी काहीच सामान नव्हते. जहाजावर पाठवण्यासाठी त्याच्याकडे काहीच नव्हते.

“मी डिकला काही पैसे देते,” मिस एलिस म्हणाली. मग तिने डिकला बैठकीच्या खोलीत बोलावले.



पण व्यापारी म्हणाला, “उधार दिलेल्या पैशांनी काम होणार नाही. अशी गोष्ट पाहिजे की, जी डिकची स्वतःची असेल, तीच वस्तू मला हवी.” डिक म्हणाला, “माझ्याकडे तर फक्त एक मांजर आहे, दुसरे काहीच नाही.”

“जा मग तुझ्या मांजराला घेवून ये,” व्यापारी म्हणाला, “आणि त्या मांजराला जहाजावर घेवून जावू दे.”

त्यांनतर डिकने ते मांजर व्यापाऱ्याला दिलं. मांजर देतांना डिकचे डोळे भरून आले. “आता रात्री माझ्या अंगावर उंदीर उड्या मारतील,मला झोपू देणार नाहीत.” डिक म्हणाला. डिकचे बोलणे ऐकून सगळेजण हसले. मग मिस. एलिसने डिकला दुसरे मांजर खरेदी करण्यासाठी एक नाणं दिलं.




जेव्हा मांजर जहाजावर गेलं तेव्हा स्वयंपाकीण बाई डिकची चांगली पिटाई करत होत्या. डिकने मांजराला विदेशात पाठवले, याची स्वयंपाकीण बाईने खूप चेष्टा केली. त्यावरून सुद्धा ती डिकला मारू लागली. त्यामुळे डिकने घर सोडून पळून जाण्याचे ठरवले. मग एक दिवस तो त्याचे जे थोडे बहुत सामान होते ते घेवून घरातून निघाला. काही अंतर तो चालला आणि मग आराम करण्यासाठी एके ठिकाणी तो बसला. कोणत्या दिशेला जावे याचा तो विचार करत होता. तेवढ्यात चर्चची घंटा वाजू लागली. टण –टण – टण



डिकला असे वाटले की ती घंटा त्याला काहीतरी सांगत आहे:

“परत फिर, डिक, लंडनचा लॉर्ड मेयर!”

“लंडनचा लार्ड मेयर!” डिकने स्वतःला विचारले. “छे! लंडनच्या लॉर्ड मेयरशी माझे काय देणे-घेणे! यापेक्षा मी व्यापाऱ्याच्या घरी जावून त्या स्वयंपाकीण बाईचा मार खाणं चांगले!” मग तो व्यापाऱ्याच्या घरी परत आला. नशिब ती स्वयंपाकीण बाई खाली येण्याच्या आत तो घरात पोहचला होता.





ज्या जहाजावर मांजर होतं ते जहाज समुद्रातील लाटांवर तरंगत होतं. शेवटी हवेने त्या जहाजाला बार्बरी देशाच्या काठावर आणलं. तिथे मूर लोक राहत होते. इंग्लडच्या लोकांना त्यांच्याबद्दल काहीच माहित नव्हते. जहाज बघून खूप लोक किनाऱ्यावर आले. त्यांना जहाजाच्या कप्तानाला आणि खलाशींना बघायचे होते. तसेच व्यापारासाठी आणलेलं सामान त्यांना पहायचं होतं.

कप्तानाने आपल्या देशातील सगळ्यात सुंदर गोष्टीचे नमुने राजाकडे पाठवले. त्यामुळे राजा इतका खुश झाला की त्याने कप्तानाला आणि इतर अधिकाऱ्यांना आपल्या महालात जेवण्यासाठी बोलावले. महाल समुद्रापासून एक मैल दूर होता.



महालात सोन्या-चांदीचे महाग गालिचे अंथरलेल होते. तिथे दरबारात राजा आणि राणी उंच सिहासनावर बसले होते.लवकरच जेवण आले. नोकरांनी ते खाली ठेवले नाहीतर, उंदरांची एक फौज आली आणि त्यांनी सर्व जेवण खाऊन साफ केले. त्यांनी सर्व खाणे महागड्या गालिच्यावर सांडून ठेवले.

हे सगळं बघून कप्तान राजाच्या मंत्र्यांना म्हणाला, “उंदरांनी सगळं उद्ध्वस्त केलं.”

“खरं आहे,” मंत्री म्हणाले, “या उंदरांनी इथे फार धुमाकूळ माजवला आहे. या उंदरांपासून सुटका करून घेण्यासाठी राजा आपली अर्धी तिजोरी द्यायला तयार आहे.”



“हे उंदीर फक्त खाण्यावरच ताव मारत नाही तर ते राजाच्या पलंगावर आक्रमण करतात! म्हणून झोपतांना राजाला त्याच्या चारी बाजूला शिपाई तैनात करावे लागतात.”

हे ऐकून कप्तानाला फार आनंद झाला. त्याला डिकच्या मांजराची आठवण आली. त्याने राजाला म्हटले, त्याच्या जवळ जहाजावर असा एक प्राणी आहे, जो लवकरच सर्व उंदरांना खाऊन टाकेन. हे ऐकून राजाने उडीच मारली आणि त्याच्या डोक्यावरची पगडीसुद्धा पडली. “त्या प्राण्याला लगेचच माझ्याकडे घेवून या!” राजाने आज्ञा दिली. “माझ्या दरबारात उंदरांनी दहशत पसरवली आहे! जर तुम्ही म्हणता ते खरं निघालं तर त्या प्राण्याच्या बदल्यात मी तुमचे जहाज हस्तिदंत, सोने आणि जवाहिर याने भरून देईन!”



हे ऐकून कप्तान धावत पळत जहाजावर आला. मधल्या काळात राजाने परत स्वयंपाक करण्यास सांगितले. जेव्हा कप्तान मांजराला घेवून आला तेव्हा जेवण गालिच्यावर ठेवलेच जात होते. तेव्हा ते खाण्यासाठी उंदीर परत जमा झाले. उंदरांना बघून मांजर कप्तानाच्या खांद्यावरून उतरलं. काहीच वेळात तिने जास्तीत जास्त उंदरांना धाराशाही पाडलं. उरलेले उंदीर घाबरून पळून आपल्या बिळात लपून बसले.

आपल्या जुन्या शत्रूला हरवलेलं पाहून राजाला खूप आनंद झाला.



त्यानंतर राणीला मांजराला बघण्याची इच्छा निर्माण झाली. जेव्हा कप्तानाने मांजराला राणीच्या हातात दिलं. तेव्हा तिला मांजराला हात लावण्याची भीती वाटली. हे बरोबरच होते. कारण याच मांजराने अनेक उंदीर मारले होते. नंतर राणीने मांजराच्या डोक्यावर थोपटले. आणि तिला “माऊ, माऊ, माऊ, म्हटले. कारण राणीला इंग्लिश अजिबात येत नव्हते. नंतर कप्तानाने मांजराला राणीच्या कुशीत दिले, आधी मांजर थोडे गुरगुरले, राणीच्या हाताशी ते खेळले आणि मग राणीच्या कुशीत झोपून गेले.



जेव्हा राजाला कळले की, मांजर आणि तिची पिल्ले राज्याला उंदरांपासून सोडवतील. तेव्हा राजाने जहाजावरील सर्व माल खरेदी केला. फक्त त्या मांजरासाठी. आणि सर्व मालाची किंमत त्याच्या तुलनेत दहा पट जास्त दिली.



जहाजात सर्व काही भरल्यानंतर कप्तान आणि इतर अधिकाऱ्यांनी राजाचा, राणीचा आणि तिथल्या लोकांचा निरोप घेतला. परत येतांना हवा चांगली होती, त्यामुळे ते लवकरच आपल्या देशात इंग्लडला परत आले.



सूर्य पूर्ण उगवलाही नाही तोच मिस्टर फित्ज़वारेन आपल्या पलंगावर बसून पैशांची मोजदाद करू लागले. तेव्हाच दरवाज्यावर टक-टक झाली.

"कोण आहे?"

"आपला मित्र कप्तान. आपले जहाज़ यूनिकॉर्न आत्ताच परत आले आहे!"

हे ऐकून व्यापारी चटकन उठला, तो आपले गाठोडे सगळे विसरून गेला, त्याने घाईने दरवाजा उघडला.



बाहेर कप्ताना आणि त्याचे अधिकारी उभे होते. त्यांच्याजवळ हिरे-जवाहिरांनी भरलेली पेटी होती. आणि त्यात इतरही अनेक वस्तू होत्या. ते बघून व्यापाऱ्याने त्यांच्या सफल यात्रेसाठी देवाचे आभार मानले. कप्तानाने व्यापाऱ्याला मांजराची सर्व कहाणी सांगितली. आणि राजाने डिक साठी जे हिरे-मोती दिले होते ते दाखवले.

त्यानंतर व्यापारी लगेचच म्हणाला:

"डिकला ही खुशखबरी सांगा.
आज नंतर त्याच्याशी सन्मानाने बोला."



त्यावेळी डिक घरात भांडी घासत होता. त्यामुळे तो स्वच्छ अशा जागेवर येवू इच्छित नव्हता. “हे बघा फरशी एकदम स्वच्छ आहे आणि माझे बूट एकदम घाण आहेत आणि त्यातून खिळे बाहेर येत आहेत.” पण व्यापाऱ्याने जबरदस्तीने त्याला बैठकीवर बोलावले.


त्याने डिकचा हात पकडून त्याचे अभिनंदन केले, “मिस्टर डिक मी आपल्या चांगल्या नशिबासाठी आपले हार्दिक अभिनंदन करू इच्छितो. कप्तानाने तुमचे मांजर बार्बरच्या राजाला विकली. मांजराच्या बदल्यात राजाने तुझ्यासाठी बेसुमार संपत्ती पाठवली आहे. आता तू तुझे जीवन छान मजेत जगू शकतो!”



जेव्हा डिकला हिऱ्या मोत्यांची पेटी दिली तेव्हा त्याने ती पेटी लगेचच आपल्या मालकाच्या पायाजवळ ठेवली. पण मिस्टर फित्जवारेन यांनी ती घेण्यास नकार दिला. त्यानंतर डिकने कप्तान आणि त्याच्या लोकांना मांजराची नीट काळजी घेतली म्हणून बक्षीस दिले. नंतर त्याने व्यापाऱ्याच्या घरातील सर्व नोकरांना बक्षीस दिले.त्यात ती दुष्ट स्वयंपाकीण पण होती.

नंतर मिस्टर फित्जवारेन ने शिंप्या कडून डिक साठी शाही कपडे शिवून घेतले. एक अलिशान घर विकत घेईपर्यंत त्याला त्याच्या घरात राहण्याची परवानगी दिली. त्यानंतर डिकचे रूप पार पालटून गेले. तो आता राजकुमार दिसू लागला होता.





लवकरच डिक मध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यानंतर मिस एलिस त्याच्याकडे आकर्षित झाली. जेव्हा मिस्टर फित्जवारीनला त्यांच्या मैत्री बद्दल समजले. तेव्हा त्याने त्या दोघांच्या लग्नाला मान्यता दिली.

लंडनचे मोठे मोठे श्रीमंत लोक, अधिकारी, आणि लॉर्ड मेयर त्यांच्या लग्नाला आले. शाही भोजनाच्या नंतर तिथे सांस्कृतिक कार्यक्रम पण झाले.



डिक आणि त्याची पत्नी एलिसला इंग्लडचे सगळ्यात सुखी दांपत्य म्हणून नावाजले गेले. नंतर डिक शेरीफ म्हणून निवडला गेला. आणि तीन वेळा तो लंडनचा लॉर्ड मेयर झाला.आपल्या पदाच्या अंतिम टप्प्यात डिकने राजा पंचम हेन्री आणि महाराणीला जेवण्यास आमंत्रित केले.

समाप्त